# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ११०-२०१०/ दिनांक :

श्री. रामचंद्र बसाप्पा बाबर,
मु.पो. सनमडी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

<u>कोरम</u> :- १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य-सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रामचंद्र बसाप्पा बाबर, मु.पो. सनमडी, ता. जत, जि. सांगली यांनी सनमडी गावातील गट क्र. ५८/१ मध्ये शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा मिळावा यासाठी दि. २६.५.२००९ रोजी वि.प.कडे अर्ज दिला आहे त्याची पोच उपलब्ध आहे. तक्रारदार यांनी कृती मानकानुसार सर्व्हीस कनेक्शन असलेस २० दिवसांत व वितरण वाहिनीचा विस्तार असलेस ३० दिवसांत चलन मिळणे आवश्यक आहे असे म्हटले आहे. तक्रारदार यांना कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार मुदतीत चलन मिळाले नाही, त्यामुळे त्यांनी दि. ६.५.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे रितसर तक्रार दाखल केली.

अंतर्गत कक्षाचे दि. ११.५.२०१० रोजी आदेश झाले, त्यामध्ये चलन मुदतीत देण्यात यावे व विलंबाबाबत भरपाई देण्यात यावी असे आदेश केले.

वितरण कंपनीने आपल्या दि. २९.६.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांचा विद्युत पुरवठा मागणी अर्ज दि. २५.५.२००९ रोजी प्राप्त झाला आहे व त्यांस दि. ६.५.२०१० रोजी चलन देण्यात आले व त्यांचे ०३० कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे असे म्हटले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २७.७.२०१० रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. श्री. मैंलापुरे यांनी आपल्या दि. २७.७.२०१० रोजी दिलेल्या अर्जात तक्रारदार यांचे ७/१२ उताऱ्यामध्ये नांव नाही, या बाबत त्यांना तोंडी सूचना दिल्या होत्या. दि. ६.५.२०१० रोजी प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत तक्रारदारांचे नांव असलेला ७/१२ उतारा वि.प.कडे देण्यात आला व त्याचदिवशी तक्रारदारांस चलन देण्यात आले. तसेच वीज कनेक्शन १ महिन्यात देण्यात येत आहे असे नमूद केले आहे श्री. खापरे यांनी विलंबासाठी भरपाई द्यावी अशी मागणी केली आहे. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदाराच्या म्हणण्याप्रमाणे कृती मानके तरतुदीचा भंग झाल्यामुळे तक्रारदार हा वि.प.कडून भरपाई मिळण्यास पात्र आहे काय ?

उत्तर : नाही

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी दि. २६.५.२००९ रोजी विद्युत पुरवठ्यासाठी अर्ज केला. त्यांना मुदतीत चलन दिले नाही. त्यांनी अंतर्गत कक्षाकडे अर्ज केला. दि. ११.५.२०१० रोजी कक्षाचे आदेश झाले. त्यापूर्वी प्रभारी सहाय्यक अभियंता, संख यांनी तक्रारदार यांस त्याने हजर केलेल्या ७/१२ उताऱ्यामध्ये त्याचे नांव नाही यची जाणीव करुन दिली, परंतु तक्रारदाराने त्याचे नांव असलेला ७/१२ उतारा हजर केला नाही. दि. ६.५.२०१० रोजी प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत तक्रारदारांचे नांव असलेला ७/१२ उतारा वि.प.कडे देण्यात आला व त्याचदिवशी तक्रारदारांस चलन देण्यात आले. त्यामुळे वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंबासाठी भरपाई माफ करावी अशी विनंती केली व सदरचे कनेक्शन १ महिन्यात देत आहे असे लेखी म्हणणे दिले आहे. असे असले तरी, प्रथमदर्शनी दि. २५.६.२००९ ते ६.५.२०१० या ११ महिन्याच्या म्हणजे ४४ आठवड्यांचा विलंब झाल्याचे दिसते. परंतु अंतर्गत कक्षाकडे सुनावणी दि. ६.५.२०१० रोजी व आदेश दि. ११.५.२०१० पूर्वी बऱ्याच घटना घडल्या आहेत. वि.प.चे प्रभारी सहाय्यक अभियंता, संख यांनी तत्परतेने तक्रारदाराचे अर्जासोबत दाखल ७/१२ उताऱ्यावर त्याचे नांव नाही हे त्यांस तोंडी सांगितले, परंतु त्याची काळवेळ कुठेही नाही. अर्जातील कथनानुसार तक्रारदारांचे प्रतिनिधी यांनी दि. ६.५.२०१० रोजी ७/१२ चा उतारा दिला व त्याचदिवशी तक्रारदारांस चलन देण्यात आले. यावरुन हे दिसून येते की, तक्रारदाराचा अर्ज परिपूर्ण नव्हता, तो अपूर्ण होता आणि तक्रारदार प्रतिनिधींनी १ महिन्यात वीज कनेक्शन देत असल्याचे वि.प.चे लेखी आश्वासन दिल्यामुळे भरपाई बाबतचा हक्क सोडून दिल्याचे मंचाच्या निदर्शनास येते. त्यास अनुसरुन तक्रार मागे घेण्यास प्रतिनिधी श्री. खापरे यांनी दि. २७.७.२०१० च्या अर्जावर लेखी संमत्ती दिली. असे असले तरी, दि. ६.५.२०१० ला तक्रारदाराचे नांव असलेला ७/१२ उतारा दिल्यानंतर त्याचदिवशी त्यांना चलन दिल्याचे दिसते, त्यामुळे विलंब झालेला नाही असे म्हटले तरी वावगे होणार नाही, म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर नाही असे द्यावे लागते. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२) वि.प.ने मंचासमोर दि. २७.७.२०१० ला दिलेल्या अर्जानुसार व लेखी हमी प्रमाणे १ महिन्याचे मुदतीत वीज जोडणी द्यावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :